## बॉम्बस्फोट दुर्घटनेतील मृतांना मंत्रिमंडळाची श्रद्धांजली

## **जखमींवरील उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करणार**

मुंबई, दि. १४ : मुंबईतील ऑपेरा हाऊस, जव्हेरी बाजार आणि दादर या तीन ठिकाणी आतंकवादी शक्तींकडून बुधवार, दि. १३ जुलै रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या दुर्घटनेचा तीव्र निषेध करीत, या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना राज्य मंत्रिमंडळाने विशेष बैठकीत श्रद्धांजली अर्पण केली व त्यांच्या कुटुंबियाप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या. जखमींच्या उपचारांवरील संपूर्ण खर्च राज्य शासनाच्यावतीने करण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

काल झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आज राज्य मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी शोकप्रदर्शक ठराव मांडला. मंत्रिमंडळाने त्याला मान्यता दिली व दोन मिनिटे स्तब्धता पाळून मृतांना श्रद्धांजली वाहिली.

शोकप्रदर्शक ठरावात म्हटले आहे की, अत्यंत भ्याड अशा या कृत्यामुळे १७ निरपराध नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले, तर १३१ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. देशाच्या सार्वभौमत्वावर हल्ला करणाऱ्या या घटनेचा मंत्रिमंडळ अत्यंत तीव्र निषेध करीत आहे. मुंबईवर झालेला हा भ्याड हल्ला असून, देशाची आर्थिक राजधानी असणाऱ्या मुंबई महानगरामध्ये अशांतता व दहशत पसरविण्यासाठी दहशतवादी शक्तींनी केलेला हा प्रयत्न आहे. मुंबई यापुर्वीही अशा घटनांना धैर्याने सामोरी गेलेली आहे आणि अशा घटनांमुळे मुंबईकर नागरिकांनी आपल्या एकीचे, धैर्याचे आणि परस्पर सामंजस्याचे दर्शन घडवून देशात अस्थिरता करण्याचे प्रयत्न उधळून लावले आहेत. या कृत्यामागे असलेल्या दहशतवादी शक्ती व त्यांच्यामागील सुत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा दृढनिश्चयही मंत्रिमंडळाने व्यक्त केला आहे.

या अत्यंत कठीण परिस्थितीचा मुंबईकरानी अत्यंत धीरोदात्तपणे सामना केला. अशा कठीण प्रसंगी जखमी व्यक्तींना मदत करणाऱ्या विविध यंत्रणा, नागरिक आणि अथक प्रयत्न करुन त्यांचे प्राण वाचविणाऱ्या डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. नागरिकांनी अतिशय धैर्याने वागून अशा प्रकारच्या कोणत्याही दहशतवादी कृत्यामुळे मुंबईकरांच्या ऐक्यभावनेला तडा जाणार नाही, असेही या ठरावात म्हटले आहे.

००००००